दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ६० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.२४ मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यात आज २६,६७२ नवीन कोरोना रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रात आज २९,१७७ रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे तर २६,६७२ नवीन कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. दुर्दैवाने आज ५९४ कोरोना रुग्णांचा मृत्यू झाला आहे. मागील काही दिवसांपासून घातलेल्या निर्बंधांचा चांगलाच परिणाम झाल्याचं समोर येत आहे. राज्यात गेल्या काही दिवसांपासून कोरोनाचे दैनंदिन आकडे कमी होत आहे. दैनंदिन आकडेवारीत रोजच्या रुग्णवाढीपेक्षा बरे होऊन घरी जाणाऱ्या रुग्णांची संख्या जास्त होत आहे. आजपर्यंत एकूण ५१,४०,२७२ कोरोना बाधित रुग्ण बरे झाले आहेत. यामुळं राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९२.१२% एवढे झाले आहे. राज्यात आज ५९४ कोरोना बाधित रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाली आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर १.५९% एवढा आहे. सध्या राज्यात २६,९६,३०६ व्यक्ती होम क्वारंटाईनमध्ये आहेत तर २१,७७१ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत. राज्यात आज एकूण ३,४८,३९५ क्टिव्ह रुग्ण आहेत.

# १० जूनला मानवी साखळी तर २४ जूनला सिडको भवनावर धडक

## लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची घोषणा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**प्रकल्पग्रस्त, शेतकरी, शेतमजूर आणि ओबीसी समाजाचे झुंझार नेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासाठी सुरू झालेली चळवळ आता जिल्ह्या-जिल्ह्यांत पसरत आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक, प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या संघटना एकत्र येऊन हा लढा आता व्यापक प्रमाणात होत आहे. येत्या १० तारखेला अखिल आगरी समाज परिषदेचे संस्थापक जी. एल. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त एकत्र जमून शपथ घेऊन आंदोलनाचे रणशिंग फुंकण्याचा निर्धार झालेल्या सर्वपक्षीय नेते आणि सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत कृती समितीने केला.**



पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या महात्मा फुले सभागृहात, नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचेच नाव देण्याच्या आंदोलनाची रणनीती ठरविण्यासाठी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ कृती समितीची बैठक दशरथदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्या वेळी हा निर्धार सर्वांनी जाहीर केला.

आपली मागणी शासनाच्या कानी घालण्यासाठी १० जून रोजी पनवेल, उरण, नवी मुंबई, ठाणे, भाईंदर, वसई, विरार, डहाणू, कल्याण, अंबरनाथ, डोंबिवली, बदलापूर, उल्हासनगर आदी ठिकाणी मानवी साखळी तयार करून शासनाचे लक्ष वेधण्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. तत्पूर्वी मुख्यमंत्री, सर्व पक्षांचे प्रमुख नेते यांना यासंबंधीचे निवेदन देऊन त्यांच्याशी चर्चा करण्याचे सर्वानुमते ठरले.

याचबरोबर येत्या २४ जून रोजी 'दि.बां'च्या स्मृतिदिनानिमित्त हा लढा व्यापक करावा, तसेच लोकभावना पायदळी तुडवून सिडकोने केलेल्या कृतीचा निषेध करण्यासाठी सिडको भवनाला हजारोंच्या संख्येने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याचा घेराव घालावा, असा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस कृती समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळाराम पाटील, उद्योजक जे. एम. म्हात्रे, उपमहापौर जगदिश गायकवाड, कार्यकारिणी सदस्य जे. डी. तांडेल, मनसेचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत, सरचिटणीस भूषण पाटील, सहचिटणीस दीपक म्हात्रे, सुरेश पाटील, भाजप नेते दशरथ भगत, साई संस्थानचे विश्वस्त रवी पाटील, नवी मुंबईतील ९५ गाव संघर्ष समितीचे दीपक पाटील, आगरी कोळी युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष निलेश पाटील, डोंबिवलीच्या २७ गाव संघर्ष समितीचे गुलाब वझे, संतोष केणे, अ‍ॅड. मनोज भुजबळ, कामगार नेते सुरेश पाटील, जासईचे मेघनाथ म्हात्रे, राजेश गायकर, विनोद म्हात्रे, जितेंद्र घरत, आगरी समाज विकास संघाचे अध्यक्ष धीरज कालेकर, दिवा मच्छीमार संघटनेचे चंदू पाटील, सागरी जमीन हक्क परिषदेचे अध्यक्ष जयेश आकरे, तसेच नवी मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आदी जिल्ह्यांतील विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### दादर मार्केटमध्ये टॅक्सीचालकाची हत्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भाडे नाकारले म्हणून संतापलेल्या फळविक्रेत्याने डोक्यात पेव्हर ब्लॉक टाकून टॅक्सीचालकाची हत्या केल्याची घटना आज दादरच्या गजबजलेल्या परिसरात घडली. छबीलाल जैस्वार (५५) असे मृत टॅक्सीचालकाचे नाव असून दादर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज वरून काही तासांतच आर-ोपी बसवराज मेलिणामनी (३०) याला अटक केली आहे. या घटनेने दादरमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

दादर मार्केटमधील कबुतरखाना येथे सकाळी ६ वाजताच्या सुमारास छबीलाल जैस्वार हा टॅक्सी घेऊन आला होता. यादरम्यान बसवराज त्या ठिकाणी आला आणि त्याने छबीलाल याला जवळच जायचे आहे असे सांगितले. मात्र, जवळचे भाडे असल्याने छबीलाल याने नकार दिला. याच परिसरात राहत असल्याने आणि फळविक्री करीत असल्याने बसवराज दादागिरी करू लागला. यावरून दोघांमध्ये जोरदार बाचाबाची झाली. यामुळे संतापलेल्या बसवराज याने जवळच असलेला सिमेंटचा पेव्हर ब्लॉक उचलला आणि छबीलाल याच्या डोक्यात मारला. त्यात डोक्याला गंभीर इजा झाल्याने छबीलाल याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच दादर पोलीस घटनास्थळी पोहचले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक मृत्यूंजय हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक महेश थिटे यांच्यासह रावराणे, संतोष पाटणे, अजित महाडीक, महेश कोलते यांच्या पथकाने प्रत्यक्षदर्शींनी दिलेली माहीती आणि सीसीटीव्ही फुटेजवरून बसवराज याला शोधून काढले.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९८२०३५५३४६**

## पनवेल विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांमध्ये ताळमेळ नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल विद्युत वितरण कंपनीचा कारभार रामभरोसे असून विद्युत वितरण कंपनीचे अधिकारी हे विद्युत बिलासाठी जनतेला वेठीस धरुन स्वतः चे खिसे भरण्यात व्यस्त असल्याचे दिसत आहे.



विद्युत वितरण कंपनीचे अव्वाच्या सव्वा आलेल्या बिलाची कोणतीही शहानिशा न करता विद्युत वितरण कंपनीचा असिस्टंट इंजिनिअर हा वरिष्ठ अधिकाऱ्यांशी कोणताही सल्लामतलब न करता विद्युत मीटर काढण्याची धमकी देत असून त्या अधिकाऱ्याबरोबर संबंधित ग्राहक बोलला असता तो वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलतो आणि सांगतो अशी उत्तरे देत असतो. प्रत्यक्षात कोणतीही चौकशी न करता त्याच ग्राहकाकडे आणखीन चार लाईनमन यांना पाठवून विद्युत मीटर काढून घेण्याची धमकी देत असतो. अशा अकार्यक्षम विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्याला आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची शासन चौकशी काय करणार याची नागरिकांना उत्सुकता लागली आहे.

याबाबत योग्य निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी न घेतल्यास काही ग्राहक न्यायालयात जाण्याच्या तयारीत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. म्हणून विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता राठोड यांनी लक्ष घालून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी विद्युत ग्राहकांमधून केली जात आहे.

## जून महिन्यापासून २४ तास लसीकरण : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात १ मे पासून १८ ते ४४ वयोगटासाठी कोविड प्रतिबंधक लसीकरण सुरू झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच पुरेसा लससाठा उपलब्ध नसल्याने हे लसीकरण स्थगित ठेवावे लागले आहे. हे लसीकरण पुन्हा कधी सुरू होणार, याकडे सर्वांचेच लक्ष लागलेले असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याविषयी आज महत्त्वाची माहिती दिली.



देशात महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक लसीकरण झाले आहे. लसीकरणात दोन कोटींचा टप्पा ओलांडणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरलं आहे. लसीकरणात महाराष्ट्र सर्वात पुढे असला तरी लससाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने लसीकरणाला काही प्रमाणात ब्रेक लागला आहे. उपलब्ध लससाठा कमी असल्याने तूर्त राज्यात दुसरा डोस आणि ४५ वर्षांवरील नागरिकांच्या लसीकरणास प्राधान्य दिलं जात आहे. या लसीकरणात खंड पडू नये म्हणून तूर्त १८ ते ४४ वयोगटाचे लसीकरण पूर्णपणे स्थगित ठेवण्यात आले आहे. असे असताना आज संभाव्य ..../२

## रायगड सागरी किनाऱ्यावर तीन दिवसात आढळले आठ मृतदेह

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

तौक्ते चक्री वादळाने रायगड जिल्ह्यासह कोकण किनारपट्टीला मोठा तडाखा बसला, या वादळाने वित्तहानी बरोबरच जीवितहानी देखील केली. रायगड जिल्ह्यात समुद्र किनाऱ्यावर तीन दिवसांत आठ मृतदेह सापडले आहेत. अलिबाग तालुक्यात शनिवारी सात, मुरूड येथे शुक्रवारी रात्री एक असे पुरुष जातीचे आठ मृतदेह सापडले आहेत.

तौक्ते चक्रीवादळा दरम्यान खोल समुद्रात बुडालेल्या पी ३०५ बार्जवरील मृतदेह असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यादृष्टीने पोलीस प्रशासनाने ओएनजीसी आणि मुंबई पोलिसांनी माहिती कळवली आहे. सध्या हे आठही मृतदेह अलिबाग जिल्हा सामान्य रुगणलायत ठेवण्यात आले आहेत. ओएनजीसी पथक नातेवाईकांना घेऊन रायगडात येणार असल्याची माहिती रायगड पोलिसांनी दिली आहे. तालुक्यातील नवगाव दोन, सासावणे दिघोडी एक, आवास एक तर किहीम समुद्रकिनारी तीन तर मुरुड समुद्रकिनारी एक असे आठ मृतदेह वाहून समुद्र किनारी आले आहेत.

या मृतदेहाची ओळख अजून पटलेली नसून पोलीस याबाबत तपास करीत आहेत. ओळख पटविण्यासाठी मृतदेहाचे शवविच्छेदन करून ..../२

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते व आ.भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत दासगाव ग्रामपंचायत कार्यालयाचे उद्घाटन संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील दासगाव ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणामध्ये बाधित झाली होती. त्यामुळे जुन्या इमारतीच्या आलेल्या निधीमधून ग्रामपंचायतीच्याच दुसऱ्या जागेमध्ये नवीन भव्य ग्रामपंचायत इमारत बांधण्यात आली असून त्या नव्या इमारतीचे उद्घाटन आज (दि.२३ मे) रोजी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते व महाड पोलादपूर चे आमदार भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले .



यावेळी प्रांताधिकारी प्रतिमा पुदल-वाड, पोलीस उपअधीक्षक निलेश तांबे, तहसिलदार दिप्ती देसाई, नायब तहसिलदार शरद कुमार आडमुठे, पोलीस उपनिरीक्षक श्री.लोणे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाड तालुक्यातील दासगाव ग्रामपंचायत ही ११ सदस्यांची असून मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणामध्ये जुनी इमारत बाधित झाली होती. त्याच्या मोबदल्यात शासनाकडून ४६ लाख रुपये मंजूर झाले होते. मोबदला प्राप्त झाल्यानंतर गावाजवळ असलेल्या ग्रामपंचायतीच्याच दुसऱ्या जागेत नवीन इमारतीचे बांधकाम करण्यात आले. नवीन इमारतीवर अंदाजे ४५ लाख रुपये एवढा खर्च झाला असल्याची माहिती ग्रामसेवक अजित पोळेकर यांनी दिली आहे.

## ना.अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलादपूर नगरपंचायतीच्या गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर नगरपंचायतीचा पाच वर्षांचा कालावधी २४ जानेवारीरोजी संपुष्टात आल्याने नगरपंचायतीचे सर्व पदाधिकारी व सदस्य बरखास्त होऊन प्रशासक नियुक्ती झाल्यानंतर तब्बल चार महिन्यानंतर नगरपंचायतीच्या विकासकामांचा शुभारंभ आणि भुमिपूजनाचा सोहळा रविवारी सकाळी आयोजित करण्यात आला. यामध्ये पोलादपूर नगरपंचायतीच्या ठेकेदारामार्फत करावयाच्या नगरस्वच्छतेसाठीच्या दोन घंटागाडयांचा शुभारंभ आ.भरत गोगावले यांच्याहस्ते नगरपंचायतीच्या आवारात करण्यात आला तर आ.गोगावले यांच्याच हस्ते



गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन पालकमंत्री ना.अदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

जिल्हा वार्षिक योजनेच्या नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत पोलादपूर नगरपंचायत क्षेत्रात अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनीमुळे लाकूडफाटयाची बचत होणार आहे. पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सध्या वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन ही बाब काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर गॅस शवदाहिनी कार्यान्वित केल्याने निश्चितच लाकडाची बचत आणि पर्यावरण संवर्धन होणार ..../२

## 'यास' चक्रीवादळ तौक्ते, अम्फान वादळाइतकंच विध्वंसक असणार; हवामान विभागाचा इशारा

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या पश्चिम किनारपट्टीला नुकतंच तौत्के चक्रीवादळाचा फटका बसला. या वादळानं हाहाकार केल्याची घटना ताजी असतानाच आता भारताच्या पूर्व किनारपट्टीवर 'यास' नावाचं चक्रीवादळ येऊन धडकणार आहे. चिंतेची बाब अशी की हे चक्रीवादळ देखील तौत्के आणि याआधीच्या अम्फान चक्रीवादळाइतकंच विध्वंसक असणार आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागनं दिली आहे.



पश्चिम किनारपट्टीवर महाराष्ट्रासह पाच राज्यांना तौत्के वादळाचा मोठा फटका बसला. यात अनेकांची घरं कोसळली तर मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान देखील झालं आहे. भारताच्या पूर्व किनारपट्टीवर 'यास' हे चक्रीवादळ येणार असून ते पुढील १२ तासांत भीषण रूप घेईल, असं हवामन विभागने म्हटलं आहे.

यास चक्रीवादळामुळे पश्चिम बंगाल ..../२

# माओवाद्यांना धडा

दुर्लक्षित परंतु चर्चित अशा वैशिष्ट्यांसाठी ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याने माओवाद्यांसोबतची आणखी एक चकमक शुक्रवारी अनुभवली. १३ माओवाद्यांचा खात्मा ही पोलिस पथकासाठी कौतुकाची गोष्ट आहे. सी-६० पथकाचे त्यासाठी अभिनंदनही करायला हवे, मात्र आणखी किती काळ हा रक्तसंहार सुरू राहणार, याचा विचारही व्हायला हवा. या चकमकींचा परिसर राज्यातील सामान्यजनांनी ऐकलेलाही नसेल. एटापल्ली तालुक्यातील कोटमी पोलिस मदत केंद्राच्या हद्दीत हा भाग येतो. पैदी जंगलपरिसरात ही चकमक झाली. त्यामागील मुख्य कारण तेंदूपानांचा व्यवहार आहे. तेंदूपाने कशासाठी उपयोगात आणली जातात याची अनेकांना कल्पना नाही. माओवादी चळवळीचे अर्थकारण त्यामागे दडले आहे. तेंदूपानांमधून खंडणी गोळा करण्याच्या कामासाठी माओवाद्यांनी ग्रामस्थांसोबत बैठक होती. रात्रभराची चर्चा ओटापताच पोलिसांनी यशस्वी चढाई केली. आधी माओवाद्यांनी जवानांना ठार करायचे, मग जवानांनी त्याचा बदला घ्यायचा असा हा रक्तखेळ १९६७पासून देशात सुरू आहे. माओवाद्यांची चळवळ तशीही पूर्णत: भरकटली आहे. वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी सुरू झालेल्या या आंदोलनाचे मुख्य ध्येय त्यांच्या शिलेदारांनी वेशीवर टांगून ठेवले आहे. जीव मुठीत घेऊन वावरणाऱ्या आदिवासी नागरिकांचे मनोगत आस्थेने जाणून घेतले तर माओवादग्रस्त प्रदेशाची खरी वेदना हाती येऊ शकेल. पोलिसांचे मनोधैर्य सध्या वाढले आहे. या चकमकीपूर्वीही त्यांनी गडचिरोलीत माओवाद्यांना मात दिली होती. दोन महिन्यांपूर्वी भामरागड सीमेलगतच्या अबुजमाडमध्ये चाल करून शस्त्र कारखाना उद्ध्वस्त केला होता. तथापि, छत्तीसगडमधील बिजापुरात तारेम जवळच्या जंगलात माओवाद्यांनी घेतलेले २२ जवानांचे बळी विसरण्याजोगे नाहीत. कधी पोलिसांची सरशी तर कधी माओवाद्यांचा वरचष्मा असा हा सातत्यक्रम आहे. बारा वर्षांपूर्वी; २१ मे २००९ रोजी रोजी गडचिरोलीत १५ जवान ठार झाले होते. त्यांना आदरांजली मिळाल्याची भावना राज्यांच्या गृहमंत्र्यांनी व्यक्त केली. सध्याच्या चकमकीचा १३ कुटुंबांवर थेट परिणाम होईल. मृतांमध्ये सात महिला आहेत. माओवाद्यांचे नेतृत्व गैरआदिवासींकडे आहे. त्यांच्या केंद्रीय समितीत महिलांवरही अन्यायच आहे. पोलिसांच्या चकमकीत आदिवासींचे बळी जातात. हिंसाचार सोडून चर्चेचा मार्ग का स्वीकारला जाऊ नये, हा प्रश्न आहे. करोनासोबत झुंज देताना साऱ्या जगाचा जीव मेटाकुटीला आला. माओवाद्यांची घसट मात्र रक्तसंघर्षाशी आहे. जुनाट तत्त्वांची री ओढताना सामान्य जनतेसोबत स्वत:च्या कार्यकर्त्यांना संसर्ग मृत्यूच्या कराल दाढेत ते लोटत सुटले आहेत. शहरातील अद्ययावत वैद्यकीय यंत्रणेने करोनापुढे हात टेकले असताना जंगलातील असुविधांशी लढत प्राण वाचविणे किती अवघड आहे याची कल्पना माओवादी कार्यकर्त्यांना नाही असे नाही. त्यांच्यापैकी अनेकांनी करोना संक्रमित झाल्यामुळे छत्तीसगडमध्ये पोलिसांपुढे शरणागती पत्करली आहे. त्यात काही दाम्पत्यांचाही समावेश आहे. लाखभर रुपयांचे इनाम असलेल्या कट्टर माओवादी कार्यकर्त्यालाही करोनाग्रस्त झाल्याने आत्मसमर्पण करावे लागले. अशा बिकट काळातही केवळ खबरी असल्याच्या संशयावरून माओवाद्यांनी आठ गावकऱ्यांना संपविले. गडचिरोली जिल्ह्यातील पोलिस ठाण्यांवर दोनवेळा क्रूड ग्रेनेडचा मारा केला. ग्रेनेडचा स्फोट न झाल्याने जीवितहानी टळली हा भाग वेगळा. देश गर्तेत गेला तरी जीव घेणे सोडायचे नाही हे निर्ढावलेपण माओवादी चळवळीत किती रुजले आहे, याचेचे हे द्योतक आहे. पूर्व विदर्भाच्या चार जिल्ह्यांतील तेंदूपानांचा व्यवसाय दीडशे कोटींच्या पुढे आहे. उद्योगाच्या कायम प्रतीक्षेत असलेला हा सीमाभाग रोजगाराअभावी होरपळतो. तेंदूपानांमुळे काही हजार लोकांची रोजगाराची तजवीज होते, मात्र त्यांचीही अवस्था इकडे आड तिकडे विहिर अशी आहे. एकीकडे वन अधिकाऱ्यांच्या तावडीत न सापडण्याची काळजी घेणाऱ्या आदिवासींना माओवाद्यांचा जाचही वेळोवेळी सोसावा लागतो. या बरोबरीला वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांनाही त सामोरे जातात. मे हा तेंदूपानांच्या हंगामाचा महत्त्वाचा महिना असतो. विदर्भातील दोन लाखांवर मजूर या प्रक्रियेशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष जुळले आहेत. लिलावांच्या उपचारांनी सुरू झालेल्या या व्यवहारांवर बड्या कंत्राटदारांची मेहेरनजर असते. माओवाद्यांना तर तिथून घबाड गवसते. काही ग्रामपंचायतींना लिलावाचे अधिकार आहेत. शेतमजुरीतून हाती न उरलेली बचत तेंदूपानांच्या पुड्यांमधून वळचणीला जोडण्याचा खटाटोप निर्धन आदिवासी कुटुंबे करतात. या मजुरांना नाडवण्याचा प्रयत्न कंत्राटदारांकडून होतो. कंत्राटदारांच्या कमाईचा वाटा गैरमार्गाने चळवळीकडे ओढण्याचे काम माओवादी करतात. नोटाबंदीच्या काळात तेंदूपत्ता हंगामाचा पैसा जंगलातून जप्त केल्याने माओवादी प्रचंड चिडले होते. तेंदूपानाच्या व्यवहारातून अनेक अपहरणेही घडली आहेत. महाराष्ट्र, छत्तीसगड, तेलंगण आणि आंध्र प्रदेश या राज्यांमधून मोठी खंडणी मिळते. त्यातील मोठा वाटा तेंदूपानाच्या उद्योगातून येतो. गडचिरोली जिल्ह्यात दारूबंदी आहे. याच जिल्ह्यांतील तेंदूपाने विडीउद्योगासाठी उपयोगात येतात. एकीकडे दारूबंदीद्वारे व्यसनाधीनतेवर आणलेला चाप विडीकाडीसाठी शिथिल करण्याचे काम इमानेइतबारे सुरू आहे. मध्यंतरी कुरखेड्यात गांजाची शेतीही आढळली होती. असा विरोधाभास थांबला तरच आदिवासी उत्थान प्रत्यक्षात येईल. कारगिल ते कन्याकुमारी आणि कच्छ ते कोहिमा या खंडप्राय देशाची राजकीय सत्ता सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने ताब्यात घेण्याचे माओवाद्यांचे स्वप्न हास्यास्पद आहे. माओवाद्यांच्या ग्रामस्थांसोबतच्या गुप्त तेंदू बैठका थांबवायला हव्यात. विकासविरोधी हिंसक मेंदूंचे शिरकाणही समयोचित ठरते. तद्वतच सरकार आणि माओवाद्यांमध्ये चर्चेची दारे उघडली तरच गडचिरोलीच्या वाट्याला उत्कर्षवाटा लाभू शकतील, हे तथ्य नजरेआड होऊ नये.

# केंद्र सरकारच्या विरोधात पेणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे निदर्शने



**दै.रायगड नगरी । पेण**

केंद्र सरकारने कोरोनाचा संकटमय काळात जनता पूर्ण पणे होरपळून जात असताना, अशा परिस्थितीत रासायनिक खतांच्या किमतीत भरमसाठ वाढ डिझेल, पेट्रोल, घरगुती गॅस किमतीत वाढ केल्याच्या निषेधार्थ पेण येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे केंद्र सरकारचे विरोधात निदर्शने करण्यात आली

चक्रीवादळ मध्ये शेतकऱ्यांना चे प्रचंड नुकसान होऊन सुद्धा गुजरात ला केंद्र सरकारने १०० कोटींची मदत केली आणि महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली ह्याचा निषेध म्हणून पेण नगरपालिका समोरील कोतवाल चौकात निदर्शने करून निषेध करण्यात आला. यावेळी पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर ,पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, शहर अध्यक्ष जितेंद्र ठाकूर माजी नगराध्यक्ष संतोष श्रृंगारापुरे पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, जिल्हा नियोजन समिती निमंत्रित सदस्य प्रसाद पाटील पाटील , महिला तालुका अध्यक्ष चैताली पाटील, शहर महिला अध्यक्ष सुचिता चव्हाण, नगरसेविका वसुधा पाटील प्रतिभा जाधव, विद्यार्थी तालुका अध्यक्ष साजन पाटील पांडुरंग जाधव, कैलास जाधव ,युवक अध्यक्ष सागर हजारे, माजी सरपंच योगेश पाटील आदि उपस्थित होते.

# खांदा कॉलनी ,नवीन पनवेल परिसरात पाण्यासाठी रहिवाशांचे हाल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी, नवीन पनवेल परिसरात मागील काही दिवसांपासून पाण्याचा अपुरा पुरवठा होत असल्याने येथील रहिवाशांचे मोठे हाल सुरु आहेत. याठिकाणी सिडको तसेच एमजेपीच्या माध्यमातुन पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस येथील पाण्याची समस्या बिकट होत चालल्याने रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

नवीन पनवेल सेक्टर ६,७ परिसरातील रहिवाशांना या पाण्याच्या समस्येचा मोठा फटका बसला असुन रहिवाशांना पाणी विकत घेऊन प्यावे लागत आहे. एकीकडे लॉकडाऊन सुरु असताना पाण्यावाचून नागरिकांचे सुरु असलेले हाल थांबवावे अशी विनंती येथील रहिवासी शरद घुले यांनी सिडकोला केली आहे. अनेकवेळा बैठका, पत्रे देऊन देखील सिडकोमार्फत काहीच हालचाली केल्या जात नसल्याचे घुले यांनी सांगितले. सिडकोचे पाणीपुरवठा अधिकारी एस सरोदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होउ शकला नाही. या दोन्ही ठिकाणी किमान १२ एमएलडी पाण्याचा तुटवडा आहे. काही दिवसांपासून पाण्याची समस्या आणखी भीषण झाली असुन एमजेपी अथवा सिडको प्रशासनाकडून देखील याबाबत योग्य माहिती दिली जात नसल्याचा आरोप रहिवासी करीत आहेत.

# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी घेतली गागोदे येथील मृत्यु झालेल्या कुटुंबियांची भेट

## राज्य शासनामार्फत ४ लाख रूपये व धान्य देणार

**दै.रायगड नगरी । पेण**

कोकणासह रायगड जिल्ह्याला बसलेल्या तौक्ते चक्रीवादळाच्या तडाख्यात पेण तालुक्यातील गागोदे आदिवासी वाडी येथील रामा बाळू कातकरी यांच्या अंगावर झाड पडून मृत्यू झाला होता तर त्यांची पत्नी सीमा कातकरी यामध्ये जबर जखमी झाल्याने सदर घटनेची पाहणी करण्यासाठी आज कॉग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी घटनास्थळी भेट दिली.



यावेळी नाना पटोले यांनी सांगितले की, तौक्ते चक्रीवादळामुळे जिल्ह्या-तील अनेक शेतकरी उद्ध्वस्त झाले असून घरांचीही पडझड झाली आहे. यासह मच्छिमारी करणा-यांना सुद्धा याचा फटका बसला असल्याने राज्य सरकारच्या माध्यमातून तात्काळ नुकसानग्रस्तांचे पंचनामे सुरू असून लवकरात लवकर भरपाई मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. नैसर्गिक आपत्तीने या आदिवासी कुटुंबांवर दुःखाचे सावट पसरले आहे. ही घटना दुर्दैवी असून या कुटुंबाला राज्य शासनाच्या मार्फत लवकरच ४ लाख रुपये आणि धान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी खासदार हुसेन दल-वाई, जिल्हाध्यक्ष माणिकराव जगताप, महिला जिल्हाध्यक्षा श्रद्धा ठाकूर, नंदा म्हात्रे, अशोक मोकल, पेण शहर अध्यक्ष प्रविण पाटील, सरचिटणीस परशुराम म्हात्रे, निलेश म्हात्रे, चंद्रकांत पाटील, सदानंद म्हात्रे, राजा म्हात्रे, हिद्दायत्ततुला कुवारे आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# कोविड सेंटरमधील रुग्णांसाठी फिरते सहज वाचनालय

**दै.रायगड नगरी । खोपोली**

कोरोनामुळे मिळालेल्या निवांत वेळेचा उत्तम वापर व्हावा याच विच-ारातून सातत्यपूर्ण सामाजिक चळवळ राबविणाऱ्या सहज सेवा फाउंडेशन मार्फत कोरोना रुग्ण ताण तणावापासून मुक्त रहावा व त्यांच्यामध्ये सकारात्मक ऊर्जा रहावी यासाठी फिरते वाचनालय उपक्रम राबविण्यात आले असून या वाचनालयाचे उदघाटन २३ मे रोजी खोपोलीतून करण्यात आल्याने सर्व स्तरावरून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.



या वाचनालयात हलकी - फुलकी मनोरंजनात्मक पुस्तके, प्रेरणा देणारी चरित्रे, सकारात्मक विचार देणारी पुस्तके, कथा, कादंबरी, धार्मिक ग्रंथ यांचा यात समावेश असून कर्जत व खालापूर तालुक्यातील फिरत्या वाचनालयाच्या या उपक्रमातुन वाचनाचा संसर्ग वाढावा यासाठी सुद्धा या प्रयोगाची मदत होऊ शकते. पुस्तके वाचून झाल्यावर ती सर्व योग्य रीतीने सॅनिटायझर केली जातील.

हाजी अश्रफ शहाबुद्दीन खान फाउंडेशन - कर्जत यांच्या मार्फत उपलब्ध करून दिलेल्या सहज रेस्क्यू व्हॅन मधून ही पुस्तके कोरोना सुरक्षा नियमांचे पालन करून हॉस्पिटलमधील रुग्णांना निशुल्क काही दिवसांसाठी परत देणे तत्वावर पोहोचवली जाणार आहेत. यासाठी राष्ट्र सेवा तालुका वाचनालय, खालापूर व निलेश बाणखेले यांचे विशेष सहकार्य लाभले असून २३ मे रोजी लोहाना हॉल - खोपोली येथे रायगड भूषण ह.भ.प.रामदास पाटील महाराज व सामाजिक कार्यकर्ते नवीनचंद्र घाटवळ यांच्या हस्ते या वाचनालयाचे उघ्दाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष दत्ताजीराव मसुरकर, खोपोली युवक राष्ट्रवादी अध्यक्ष अतुल पाटील, राजेंद्र फक्के, मोइन शेख, राकेश ओस-वाल, जी.आर.भोसले, मोहन केदार, मंगेश सुखदरे, शार्दूल देशमुख, शैलेश विठलानी, दत्ता गिरी, रवींद्र कानेटकर, परेश मजेठीया, निलेश मोडवे, शार्दूल देशमुख उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जून महिन्यापासून २४ तास लसीकरण : मुख्यमंत्री

तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या बालरोग तज्ज्ञांच्या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री ठाकरे यांनी लसीकरणावर भाष्य केले.

केंद्र सरकारने १८ ते ४४ या वयोगटाच्या लसीकरणाची जबाबदारी राज्य सरकारवर टाकली आहे. ती जबाबदारी पार पाडण्यास आम्ही सक्षम आहोत. राज्यात या वयोगटात साधारण ६ कोटी नागरिक असून त्यासाठी जे १२ कोटी डोस लागणार आहेत ते एकरकमी खरेदी करण्याची आपली तयारी आहे. मात्र सध्या आपल्याला पुरेशा प्रमाणात लस उपलब्ध होऊ शकलेली नाही. जी माहिती माझ्याकडे आली आहे त्यानुसार जूनपर्यंत उत्पादन क्षमता वाढण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास लसपुरवठा सुरळीत होईल व त्यानंतर युद्धपातळीवर लसीकरण मोहीम हाती घेण्यात येईल. मुबलक लससाठा उपलब्ध होताच राज्यात २४ तास लसीकरण करण्याची आमची तयारी आहे, असे महत्त्वाचे विधान मुख्यमंत्र्यांनी केले. १८ वर्षांखालील मुलांवरील लसचीही सध्या चाचणी सुरू आहे. या मुलांना कोणती लस द्यायची याचा निर्णय अद्याप झालेला नाही. हा निर्णय झाल्यावर केंद्राकडून सूचना येतील. या सूचना येताच या मुलांचेही लसीकरण तातडीने हाती घेतले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी पुढे नमूद केले.

## रायगड सागरी किनाऱ्यावर तीन दिवसात आढळले आठ मृतदेह

डीएनए सॅम्पल घेण्यात आले आहेत. तसेच ओएनजीसी अधिकाऱ्यांना ओळख पटविण्यासाठी येण्यास कळविले आहे, असे पोलिस निरीक्षक सोनके यांनी सांगितले आहे.

## पोलादपूर नगरपंचायतीच्या गॅस शवदाहिनीचे भूमिपूजन

आहे. पोलादपूर नगरपंचायतीच्या आवारात आ.गोगावले यांच्याहस्ते लोकार्पण करण्यात आलेल्या दोन घंटागाडयांमुळे शहरातील कचरा उचलण्यास मदत होणार असून शहर स्वच्छ होण्याच्या दृष्टीनेही या घंटागाडया उपयुक्त ठरणार आहेत.

रायगड जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, शहरप्रमुख सुरेश पवार, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, माजी नगरसेवक नागेश पवार, राजन पाटणकर, माजी सरपंच मनोज प्रजापती, मंगेश नगरकर, विनायक दिक्षित, अमरदीप नगरकर, ऋषिकेश मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे सेवादल जिल्हाध्यक्ष वाय.सी. जाधव, अल्पसंख्यांक सेलचे तालुका अध्यक्ष महंमद मुजावर, महिला तालुका अध्यक्षा प्रतिभा पवार, शहरअध्यक्ष अजित खेडेकर, अनिलकुमार भोसले, प्रांताधिकारी तथा नगरपंचायत प्रशासक प्रतिमा पुदलवाड, आयपीएस पोलीस उपअधीक्षक निलेश तांबे, तहसिलदार दिप्ती देसाई, मुख्याधिकारी विराज लबडे, नायब तहसिलदार शरद आडमुठे, पोलीस उपनिरीक्षक लोणे यांच्यासह पदाधिकारी, शासकीय अधिकारी कर्मचारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलादपूर नगरपंचायतीच्या आगामी पंचवार्षिक निवडणुका कोविड संसर्गासंदर्भातील लॉकडाऊन काळात अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आल्यानंतर पोलादपूर शहरात आलेली राजकीय मरगळ किमान शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या राजकीय कार्यकर्त्यांच्या एकोप्यामुळे दूर झाल्याचे दिसून आले.

## 'यास' चक्रीवादळ तौत्के, अम्फान वादळाइतकंच विध्वंसक असणार

आणि ओदिशाच्या किनारपट्टी भागात वादळी वारे वाहणार असून मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यात वाऱ्याचा वेग तब्बल १८५ किमी प्रतितास इतकी असू शकतो, असा अलर्ट हवामान खात्यानं दिला आहे. यास वादळाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार देखील कामाला लागलं असून एनडीआरएफच्या तुकड्या रवाना करण्यात आल्या आहेत. तसेच किनारपट्टी भागातील नागरिकांचं सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यासही सुरुवात झाली आहे.

बंगालच्या उपसागरात पूर्व मध्य भागात कमी दबावाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. पुढील १२ तासांत हा दबाव क्षेत्र उत्तर-पश्चिम दिशेला पुढे सरकण्याची शक्यता आहे. चक्रीवादळ २४ मेपर्यंत आणखी तीव्र होईल आणि २६ मे रोजी ओडिशाची उत्तर किनारपट्टी आणि पश्चिम बंगाल आणि बांगलादेशच्या किनाऱ्याला धडकेल, असा इशारा हवामान विभागाच्या भुवनेश्वर उपकेंद्राच्या उपसंचालकांनी दिला आहे. हे चक्रीवादळ तौक्ते आणि अम्फान चक्रीवादळांइतकेच विध्वंसक असेल, असा इशारा हवामान विभागाचे डीजीएम मृत्युंजय महापात्रा यांनी दिला आहे.

# रोहा तालुक्यातील धाटाव येथील क्रीडा संकुलाची आदिती तटकरे यांनी केली पाहणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

तौक्ते चक्रीवादळामुळे जिल्ह्यातील घरे, शेती, वीजेचे खांब, शासकीय इमारती यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे रोहा तालुक्यातील धाटाव येथील क्रीडा संकुलाचेदेखील या चक्रीवादळात नुकसान झाले आहे. आज (दि.२२मे) रोजी या ठिकाणी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी भेट देत झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना झालेल्या नुकसानीची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत निर्देश दिले.



तसेच त्या म्हणाल्या की, या क्रीडासंकुलात खेळाडूना तसेच नागरिकांना आवश्यक सोयीसुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील. यावेळी पंचायत समिती उपसभापती रामभाऊ सकपाळ, संतोष भोईर, रोहिदास पाशिलकर, प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने तहसिलदार कविता जाधव, पोलीस विभागाचे अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय महाडिक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री.देवकासे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे हे उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्रीमती.आरती अजय असरानी यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : मालडुंगे, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं.व हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८२/२/अ/२ | १.५०.०० पो.ख. ०.५०.०० एकूण २.००.०० पैकी ०.२०.५० या क्षेत्राकरिता | ०.३२ | श्रीमती.आरती अजय असरानी |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२२/०५/२०२१

सही/-
**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला,**
**नगरपालिका कॉम्प्लेक्स,**
**भाजी मार्केट जवळ, पनवेल,**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**



अर्जदारतर्फे वकील
ॲड.अक्षय सुरेश भोईर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.३१२/२०२१
ने.ता.४/६/२०२१

श्री.अंबाजी बाळु कातकरी
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत कुंडेवहाळ
ग्रामसेवक कुंडेवहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.गंगुबाई बाळु कातकरी यांचा मृत्यू दि.१४/११/२००० रोजी रा.मु.पो.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. म्हणून अर्जदार श्री.अंबाजी बाळु कातकरी यांनी कै.गंगुबाई बाळू कातकरी यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.गंगुबाई बाळु कातकरी यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झाला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर जाहीर नामाच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी ०९ आज ०४ रोजी २०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शिक्षक मित्रांची कोरोना रुग्णांना केली मदत

**दै.रायगड नगरी । उरण**

सध्या जगावर खुप मोठे कोरोना नावाचे संकट आले आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात मनुष्य हानी झाली आहे. आपले जवळचे नातेवाईक, मित्र, ही आपल्या डोळ्यासमोर गेले पण आपण काहीही करू शकत नाही. अशावेळी ह्या रुग्णांना मानसिक धीर देणे गरजेचे असते.यासाठी अनेक सामाजिक संस्था आपली सामाजिक बांधिलकी जपत मदत करताना आपल्याला दिसून येतात.

या अनुषंगाने पंचरत्न अध्यापक विद्यालत पिरकोनचे सन १९९४ ते ९६ च्या डि एड बॅचचे विद्यार्थी मित्र व सद्या महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेले शिक्षक मित्रांनी एकत्र येऊन समर्पित कोविड सेंटर उरण येथे कोरोना रुग्णासाठी आवश्यक असणारे साहित्य भेट दिले त्यामध्ये मिक्स ड्रायफ्रूडची ४०० पाकिटे १५० पाकिटे,पिण्याच्या पाण्याच्या ५०० बॉटल इत्यादी साहित्य त्यांना देण्यात आले आहे.

## पाली खोपोली राज्य महामार्गावर पेडली येथे फसला मोठा ट्रेलर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली खोपोली राज्य महामार्ग रुंदीकरणाचे काम मागील अनेक वर्षांपासून सुरू आहे. अशातच या मार्गावर अपघाताच्या लहान मोठ्या घटना घडतच आहेत. गुरुवारी (ता.२०) सायंकाळी पेडली गावाजवळ मोठा ट्रेलर मोरीमध्ये फसला होता. त्यामुळे येथील वाहतूक ठप्प झाली होती. हा ट्रेलर रात्री उशिरा अथक प्रयत्नांनी काढण्यात आला. त्यानंतर येथील वाहतूक सुरळीत झाली.

पाली खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. पेडली जवळ एका मोरीचे काम सुरु होते. आणि या मोरीमध्ये हा मोठा ट्रेलर फसला होता. सुधागड पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी सकाळला सांगितले की रात्री हा टेलर काढण्यात आला असून वाहतूक सुरळीत सुरू आहे. एमएसआरडीसी ने केलेल्या गलथान कामामुळे असे झाले असल्याचे वंचीत बहुजन आघाडीचे सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी सांगितले. या मार्गावर अवजड वाहनांना बंदी असतांना देखील अवजड वाहतूक कशी सुरू होती असा सवाल मनसे तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी उपस्थित केला.



# माणसाचे लसीकरण लांबले, जनावरांचे लटकले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यात सध्या केवळ ४५ वर्षावरील व्यक्तींना आणि दुसरा डोस घेणारयांचेच कोरोना लसीकरण सुरू आहे. एकीकडे माणसांचे लसीकरण थांबलेले असताना जनावरांचे मे महिन्यात होणारे लसीकरण ही लटकले आहे. जनावरांच्या लसी उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याने काही दिवसांपासून हे लसीकरण लटकले आहे.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे सगळीकडे संचारबंदी लागू करण्यात आली आहे. मान्सून काही दिवसांत जिल्ह्यात धडकणार आहे. या काळात केले जाणारे जनावरांचे लसीकरण लटकल्याचे चिन्ह असून लसीची मागणी करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात जवळपास चार लाख पशुधन आहे. यामध्ये गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या, बैल आदींचा समावेश आहे. पावसाळ्यापूर्वी जनावरांना लसीकरण करणे गरजेचे असून, ते केले नाही तर टीपीआर, एफएमडी, घटसर्फ, फऱ्या, लाळ्याखुरकुत, अंत्रविषार आदी रोगांचा प्रदुर्भाव होण्याची शक्यता असते. तसेच यातील काही रोग हे संसर्गजन्य असल्यामुळे त्याचा प्रसार होण्याची देखील शक्यता असते. त्यामुळे लसीकरण करणे गरजेचे असून कोरोनामुळे लस प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे चित्र आहे. कोरोना विषाणू संसर्गाने मागील वर्षापासून जिल्ह्यात कहर केला आहे. कोरोनाबाधित रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असताना मृत्यूसंख्याही दररोज नवा उच्चांक गाठत आहे. गतवर्षी मानवावर कोरोनाचे, तर जनावरांवर स्कीन डिसीजने आक्रमण केले होते. सध्या कोरोनाचे संकट कायम असून त्याचा सर्वच घटकांवर मोठा परिणाम जाणवत आहे.

जनावरांमध्ये आढळणा-या अतिसांसर्गिक आजारांमध्ये लाळखुरकत हा एक महत्त्वाचा आजार आहे. हा आजार विषाणूजन्य आहे. जनावरांचा एकमेकांशी संपर्क आल्यामुळे संसर्गातून हा आजार होतो. या आजाराची लागण एका जनावराकडून अनेक जनावरांना होते. जनावरांना ताप येणे, लाळ गळणे, नाकातून स्त्राव वाहणे अशी या आजाराची लक्षणे आहेत. यात रोगप्रतिकारशक्ती होऊन जनावर दगावण्याचीही शक्यता असते. प्रतिबंधाकरिता शासनामार्फत वर्षातून दोनवेळा लसीकरण मोहीम हाती घेतली जाते. गतवर्षी पावसामुळे लसीकरण मोहीम लांबली होती. ती नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात पूर्ण करण्यात आली. लसीचा हा कालावधी आता संपत आला आहे. मात्र, जिल्हा पशुसंवर्धन विभागाला शासनाकडून लसीचा पुरवठा झालेला नाही.

### जनावरांना दिल्या जातात या लसी

**वेगवेगळ्या ऋतूमध्ये पशुधनासाठी लसीकरण केले जाते. पशुवैद्यकीय विभागाच्या वतीने घरोघरी जाऊन पशुधनाची संख्या लक्षा घेऊन लसीकरण मोहीम राबवली जाते. कोंबड्यादेवी, मानमोड़ी (रानीखेत), पीपीआर, घटसर्प, फऱ्या, लाळ्याखुरकुत, अंत्रविषार आदी लसीकरण केले जाते. मात्र, कोरोनाच्या संसर्ग वाढल्यामुळे पशुधनाच्या लसीकरणास मात्र अडचणी निर्माण होत आहेत. पावसाळ्यापूर्वी घेण्यात येणाऱ्या लसीचे नियोजन मात्र पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आलेले आहे.**

**मान्सूनपुर्व लसीकरण करण्यासाठी लसीची मागणी केली आहे. पुण्यावरून लसी प्राप्त होतात. लवकरच लस प्राप्त होऊन मोहीम सुरू होईल. लसीकरण केले जाणार आहे.**

**: डॉ. सुभाष म्हस्के,**
**जिल्हा पशुसंर्वधन, उपायुक्त**

## परराज्यातून येणाऱ्या प्रवाशांची आरटीपीसीआर चाचणी करा :ॲड.मनोज भुजबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

परराज्यातून रेल्वेने येणार्याच प्रवाशांची कोविडची आरटीपीसीआर चाचणी केल्याशिवाय महानगरपालिका क्षेत्रात प्रवेश देण्यात येऊ नये, अशी मागणी नगरसेवक मनोज भुजबळ यांनी आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भात त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर, महापौर कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर यांनाही निवेदनाची प्रत दिली आहे. भुजबळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, सध्या कोरोनाच्या दुसर्या. लाटेने देशात थैमान घातलेले असून नव्याने म्युकर मायकोसिस ह्या बुरशीजन्य विकाराचे रुग्ण संख्या वाढत आहे. पनवेल महानगर पालिकेच्या क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापौर डॉ.कविता चौतमोल,स भागृह नेते परेश ठाकूर आणि आपल्या सर्व प्रशासकीय कर्मचार्यांनच्या अथक प्रयत्नांने कोरोनाची दुसरी लाट आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला आणि त्यास मोठ्या प्रमाणात यश आल्याचे दिसत आहे. परंतु ह्या यशाने आपण कोणीच गाफिल न राहता यापुढे आपण सर्वांनी मिळून कोरोनाची तिसरी लाट न येऊ देणे, अथवा कोरोंनाचे रुग्ण यापुढे वाढू नये, यासाठी जागरूक राहणे खूप महत्वाचे आहे. त्यातच नव्याने वाढत असलेला म्युकरमायकोसिस हा आजारही वाढण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

पनवेल हे वाढते शहर असून पनवेल मध्ये देशाच्या काना कोपर्यातून लोक, रहिवाशी वास्तव्यास आले आहेत. पनवेल मध्ये येणारे बर्याच अंशी लोक हे परराज्यातून ये जा करत असतात. तरी अश्या परराज्यातून येणार्याण प्रत्येक नागरिकाचे पनवेल रेल्वे स्टेशन वर कोरोनाची आरटीपीसीआर टेस्ट करूनच पनवेल शहरात प्रवेश द्यावा. अन्यथा काही बाधीत रुग्ण जर सैरपणे शहरात फिरू लागले तर पुन्हा शहरात कोरोना संसर्ग वाढून येणारे संकट हे भीषण होईल, त्यामुळे याची दक्षता घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, असे नगरसेवक मनोज भुजबळ यांनी नमूद केले आहे.

## शेतकऱ्यांना बांधावर भात बियांबरोबर खतांचे वाटप



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांचे पालन करत उरण तालुक्यातील खोपटे-बांधपाडा ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांना कृषी विभागातर्फे बांधावर भात बियांना बरोबर खतांचे वाटप तालुका कृषि अधिकारी श्रीमती शर्मिला जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांनी भात बियाणे खरेदी करण्यासाठी आपली उपस्थिती लावली होती.

कृषि अधिकारी श्रीमती शर्मिला जाधव यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की नूकताच चक्रीवादळामुळे अवकाळी पाऊस पडला आहे.हा पाऊस पेरणी योग्य नाही. जून महिन्यात येणा-या पावसाळ्यात प्रत्येक शेतकऱ्यानी आप आपल्या शेतात भात बियांनाची पेरणी करावी.

तसेच तालुका कृषी विभागाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुचनांचे प्रत्येक शेतकऱ्यानी पालन करत शेतीच्या मशागतीच्या कामांना सुरुवात करावी. अशा मशागतीच्या कामांमूळे निश्चितच खोपटा, कोप्रोली या परिसरातील गोऱ्या व खाऱ्या पाण्याचे मिश्रण असलेल्या शेतजमीनीत भाताचे पीक मुबलक प्रमाणात येईल, तसेच शेतकऱ्यांनी नैसर्गिक खतांचा वापर करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे ही आवाहन शेवटी कृषि अधिकारी श्रीमती शर्मिला जाधव यांनी केले.

याप्रसंगी तालुका कृषी पर्यवेक्षक एन.वाय. घरत, कृषी सहाय्यक एस.एस. अंबुलगेकर, बांधपाडा ग्रामपंचायतीच्या सरपंच विशाखा ठाकूर यांनी श्रीमती शर्मिला जाधव यांचे कौतुक केले.

## नागोठण्यातील आग लागलेल्या ठिकाणी पालकमंत्री आदिती तटकरे यांची भेट

### नुकसानग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई देण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे एसटी स्थानका समोर असलेल्या गोळे कुटुंबियांच्या जुन्या इमारतीला गुरूवारी (दि.२०) मध्य रात्री भीषण आग लागली होती. ही आग एवढी भडकली होती की, या इमारती मधील भाडेकरू असलेल्या रायका बंधू यांच्या साई लक्ष्मी स्वीट अँड फरसान मार्ट या मुख्य दुकानासह ६ अन्य दुकाने आगीच्या भक्षस्थानी पडली होती. तर इतर ३ दुकानांनाचेही या आगीमुळे थोड्याफार प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे या आगीत नुकसान झाल्याचा आकडा एकत्रितपणे सुमारे ७० लाखांपर्यंत पोचला होता.



या आगीची माहिती मिळताच रायगडच्या पालकमंत्री ना. कु. आदितीताई तटकरे यांनीही शुक्रवार दि. २१ मे रोजी सायंकाळी आपल्या व्यस्त दौ-यातून तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी दुकानाचे मालक व भाडेकरू यांच्या सोबत चर्चा करून तलाठी व महसूल प्रशासनाला या घटनेचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. यावेळी उपस्थित असलेले रोहाचे प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने यांनाही ना. आदितीताई तटकरे यांना नुकसानभरपाई संदर्भात आवश्यक त्या सुचना केल्या.

तसेच नुकसान ग्रस्तांना जास्तीत जास्त मदत मिळून देण्याचे आश्वासन यावेळी ना. आदितीताईंनी दिले. यावेळी राष्ट्रवादीचे जेष्ठ नेते भाई टके, विलास गोळे, नागोठणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास चौलकर, रोहाचे प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने, रोहाचे पोलिस उपाधिक्षक किरणकुमार सुर्यवंशी आदींसह गोळे कुटुंबीय तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे शहर व विभागातील कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## म्हसळ्यातील ग्रामिण रुग्णालयासह आरोग्य व्यवस्थेचे बळकटी आणि विस्तारीकरण आवश्यक : नंदू शिर्के

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात ८१ गावे त्यांची लोक संख्या ६१ हजार ५४६ त्याना आरोग्य सेवा पुरविणारी यंत्रणा म्हणजे शहरातील एक ग्रामिण रुग्णालय आणि म्हसळा, मेंदडी व खामगाव अशी जिल्हा परिषदेची तीन प्रा.आरोग्य केंद्र, पाभरे येथील जि.प. दवाखाना अशी आरोग्य यंत्रणा कार्यरत आहे. परंतु आज मितीला ही सर्व यंत्रणा गेले काही वर्ष अर्धवट आहे. राज्य व जिल्हा पातळीवरील आरोग्य यंत्रणेतील कर्मचाऱ्यांची ५०% पदे रिक्तआहेत. त्यामुळे संकल्प निरोगी महाराष्ट्रातील म्हसळ्याचे आरोग्य कसे सदृढ होणार असा आसा सवाल अनेक सामाजिक कार्यकर्ते व शिवसेनेचे माजी ता.प्रमुख नंदू शिर्के यानी उपस्थित केला.

जिल्हा परिषदेच्या प्रा.आ. केंदाममध्ये प्रामुख्याने औषध निर्माता (मिश्रक), आरोग्य सेवक (महिला व पुरुष), स्त्री परिचर, शिपाई अशा पदांची संख्या मोठया प्रमाणात रिक्त आहे. म्हसळा येथे ग्रामिण रुग्णालय२०१४ पासून सुरू झाले असून तेथेही आरोग्य सेवे साठी अपुरा युतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्ग, पुरेशा सुविधा व यंत्रणनसल्याचे सांगण्यात येते. ग्रामिण रुग्णालय म्हसळयाला गेले ७ वर्ष कायमस्वरूपी अधिक्षक नाही. उप जिल्हा रुग्णालय श्रीवर्धन व ग्रामिण रुग्णालय जसवली अशा दोन ठिकाणी सेवा देणाऱ्या डॉ.मधुकर ढवळे यांच्याकडे म्हसळा ग्रामिण रुग्णालयचे अधिक्षक पदाचा अतिरीक्त कार्यभार दिल्याने म्हसळा ग्रामिण रुग्णालयाचे अस्थापनेवर कमी जास्त ताण होत असतो. म्हसळा ग्रामिण रुग्णालया साठी येणारी यंत्रसामग्री, अन्यत्र वळविली जाते. म्हसळा ग्रामिण रुग्णालयासाठी आलेल्या इशव माणगाव उपजिल्हा रुग्णालयासाठी देण्यात आल्या, तर उप जिल्हा रुग्णालय रोहा येथे २०१९पासून बंद असलेले एक्सरे मशिन एप्रिल २०२१ ला म्हसळा येथे आणले ते सध्या घूळ खात आहे, म्हसळा ग्रामिण रुग्णालयातील अनेक पदे अन्यत्र वळविली आसल्याचे समजते ती तात्काळ पूर्ववत आणावी अशी मागणी पुढे येत आहे.

**म्हसळा ग्रामिण रुग्णालयामध्ये ऑक्सिजनच्या उपलब्धते सह २०-३० खाटांचे 'डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर' (डीसीएचसी) सुरू करण्यात येणार आसल्याचे समजते ते नक्कीच कौतुकाचे आहे. पण म्हसळा ग्रामिण रुग्णालया साठी कायम स्वरूपी अधिक्षक तात्काळ नेमावा, म्हसळा तालुक्यातील आरोग्य संस्थाचा दर्जा, सोयी-सुविधा आणि आरोग्य सेवा बळकट कराव्या तसेच गरीब व्यक्तीं मध्ये जगण्याची आणि निरोगी आयुष्याची नवी उमेद निर्माण करण्याची संधी आरोग्य विभागाने घ्यावी.**

**नंदू शिर्के, मा.तालुका प्रमुख म्हसळा**

## मुलीच्या विवाहा निमित्त कोरोना रुग्णांसाठी एक लाखाची मदत



**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय जांभळे यांचे मुलीचे विवाहा निमित्त पेण तालुक्यातील कौरोना रुग्नासाठी एक लाख रुपयांची मदत केली आहे. त्यांनी मदतीचा धनादेश वडखळचे मंडळ अधिकारी डी.एस. साळुंखे यांचेकडे सपुर्द केला.

पेण तालुक्यात दिवसोदिवस कोरोना रुग्नांची संख्या वाढत असताना सामजिक बांधिलकी जपत संजय जांभळे यांनी आपली कन्या कृतिका हिच्या विवाहा निमित्त रुग्नाच्या उपचारासाठी एक लाखाची मदत केली या वेळी पेणचे आमदार रविशेठ पाटील, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, महाडचे आमदार, भरत गोगावले, खालापुरचे आमदार महेंद्र थोरवे आदि मान्यवर उपस्थित होते.

## दिघी सागरी पोलीस ठाणे व शिवशंभू प्रतिष्ठानतर्फे रक्तदान शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी सागरी पोलीस ठाणे व शिवशंभू प्रतिष्ठान यांच्या संयुक्तेने रविवार दि. २३ मे रोजी रक्तदान शिबिर संपन्न झाले.

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील दिघी सागरी पोलीस ठाण्या मध्ये हे शिबिर संपन्न झाले. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय रक्तपेढी मार्फत रक्त संकलित करण्यात आले. यावेळी ८१ जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरात प्रशासन-डॉक्टरांनी दिलेल्या सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्यात आले तसेच सोशल डिस्टंसिंग कडे विशेष लक्ष देण्यात आले. या शिबिराचे आयोजन दिघी सागरी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

प्रसंगी रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दिपक गोसावी, हेमकांत सोनार, सुनील बंदीसोडे, आकाश सावंत, रवींद्र कदम, महेश घाडगे हे उपस्थित होते. कोरोना व्हायरस या आजाराने महाराष्ट्रात थैमान घातल्यामुळे महाराष्ट्रातील सर्वच शासकीय यंत्रणा हैराण झाल्या असून याचा प्रभाव आरोग्य यंत्रणेवर देखील पडला आहे. रक्तपेढी यांच्या आवश्यकतेनुसार रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. यावेळी शिबीरासाठी आयोजकीय पोलीस ठाणे अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश चौलकरसह अनेक सदस्यांनी मेहनत घेतली. यामध्ये रक्तदाते पोलीस अधिकारी, होमगार्ड, प्रतिष्ठानचे शिवमावळे तसेच बोर्लीपंचतन परिसरातील नागरिकांनी अमूल्य असे रक्तदान केले. रक्तदान शिबिरामध्ये उपस्थित सर्व रक्तदात्यांचे, मान्यवरांचे आभार पोलीस ठाण्याकडून देण्यात आले.



# संक्षिप्त...

## उरण लायन्स क्लबच्या वतीने गाडे हॉस्पिटलला ऑक्सिजन मशीन प्रदान

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणात दैनंदिन होत असणारी करोना रुग्णांची वाढ, त्यामुळे रुग्णांवर उपचारासाठी संजीवनी ठरलेला ऑक्सिजन आणि त्याची वाढती मागणी लक्षात घेता खासगी रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या अन्य रुग्णांना भासणारा ऑक्सिजन सिलेंडरचा तुटवडा ही उणीव भरून काढण्यासाठी लायन्स क्लब ऑफ उरणच्या वतीने उरण येथिल गाडे हॉस्पिटलसाठी विजेवर चालणारे ऑक्सिजन निर्मितीचे स्वयंचलीत मशीन प्रदान करण्यात आले आहे.

या प्रसंगी डीस्ट्रीक चेअर पर्सन ला.सदानंद गायकवाड, लायन्सक्लबचे अध्यक्ष ला.प्रकाश नाईक ला.डॉ.संतोष गाडे, झोन चेअरपर्सन ला.डॉ.प्रीती गाडे, ला.प्रमिला गाडे, ला.अनंता गायकवाड यांच्यासह लायन्सक्लबचे अन्य सदस्य उपस्थित होते.

## ४ लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहतीमधून होलसेल आंब्यांची विक्री करणाऱ्या एका व्यवसायिकाची जवळपास ४ लाख ४० हजारांची फसवणूक झाल्याची घटना अज्ञात त्रिकूटांनी केली आहे. अनिकेत कन्हेरे या व्यवसायिकाचा मासे व आंबे विक्रीचा होलसेल व्यवसाय आहे. यासंदर्भात त्यांनी एका एपवर जाहिरात टाकली होती. त्या माध्यमातून मुकेश पटेल नामक व्यक्तीने त्याला ९०० डझन आंब्याच्या २०० पेट्यांची २२०० प्रमाणे ऑर्डर दिली होती. त्यानुसार त्याने सदर माल हा मुंबई येथील क्रॉफर्ड मार्केट येथे पोहोचविण्यास गेला होता. परंतु तेथे पावसाचे पाणी भरल्याचे सांगून पेट्या शिवडी-रे रोड येथील बीपीटी टोलनाक्याच्या पुढे आणण्यास सांगितले. त्यानुसार अनिकेत याने सदर माल सलिम नावाच्या व्यक्तीकडे ताब्यात दिला व पैशांची मागणी केली असता क्रॉफर्ड मार्केट येथील कार्यालयात जाऊन पैसे घेण्यास सांगितले. सलिमने अनिकेत सोबत आणखी एकास पाठवले मात्र तिथे गेल्यानंतर मुकेश पटेल याचे ऑफिस नसल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्याला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने याबाबतची तक्रार कळंबोली पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## तीन तोतया पोलिसांनी एका महिलेला दिड लाखांना लुबाडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलिस असल्याची बतावणी करून तिघ तोतया पोलिसांनी एका महिलेकडून जवळपास दिड लाखांचे दागिने लुबाडून नेल्याची घटना कळंबोली वसाहतीत घडली आहे. लोचना जगदाळे (वय-५२) डिमार्टला खरेदीसाठी जात असताना तिघा भामट्यांनी त्यांना अडविले व आपण पोलिस असल्याचे सांगून त्यांच्याकडील दागिने काढायला सांगून सदर दागिने पिशवीत बांधून देण्याच्या बहाण्याने आपल्याकडे घेऊन त्या तिघांनी हात चलाखीने दागिने चोरले त्यानंतर पिशवी जगदाळे यांना देऊन पलायन केले. काही वेळाने त्यांनी पिशवी उघडून बघितली असता त्यात दागिने आढळून आले नाहीत.

# येतील त्यांच्या सोबत आणि नाही येणार त्यांच्याशिवाय हा लढा..

## दि.बा.पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची वज्रमुठ

## आता शांततेचा मार्ग नाही, दिबांच्या नावासाठी काहीही करण्याची तयारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



दि.बा.साहेबांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेच पाहिजे, अन्यथा संघर्षाच्या ठिणगीचे रूपांतर वणव्यात करण्याचा गर्भित इशारा लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने जासई येथे झालेल्या बैठकीतून शासनाला दिला. 'आता शांततेचा मार्ग नाही' अशी रोखठोक भूमिका घेण्याबरोबर 'येईल तो आपल्या सोबत नाही येईल त्याच्याशिवाय हा लढा' अशी वज्रमूठ करत दिबांच्या नावासाठी काहीही करण्याची तयारी या बैठकीत स्पष्टपणे दिसून आली.

जासई हायस्कुलच्या प्रांगणात शुक्रवारी सायंकाळी झालेल्या या बैठकीस लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, माजी खासदार संजीव नाईक, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळाराम पाटील, कार्यकारिणी सदस्य उद्योजक जे. एम. म्हात्रे, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर जगदिश गायकवाड, सभागृहनेते परेश ठाकूर, जे. डी. तांडेल, सरचिटणीस भूषण पाटील, सहचिटणीस सुरेश पाटील, दीपक म्हात्रे, माजी पंचायत समिती सभापती नरेश घरत, मनसेचे जिल्हाध्यक्ष अतुल भगत, भाजपचे युवा नेते दशरथ भगत, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य राजेंद्र पाटील, साई संस्थांचे विश्वस्त रवी पाटील, नाथा पाटील, निलेश पाटील, गुलाब वझे, संतोष केणे, माजी उपमहापौर चारुशिला घरत, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, अनिता पाटील, हेमलता म्हात्रे, नगरसेवक हरेश केणी, मनोज भुजबळ, अजय बहिरा, अभिमन्यू पाटील, तेजस कांडपिळे, विकास घरत, विजय चिपळेकर, शत्रुघ्न काकडे, नरेश ठाकूर, नगरसेविका दर्शना भोईर, संतोषी तुपे, मेघनाथ म्हात्रे, राजेश गायकर, दिलीप पाटील, संजय ठाकूर, यशवंत घरत, माणिक म्हात्रे, संतोष घरत, विनोद म्हात्रे तसेच रायगड, नवी मुंबई, ठाणे, पालघर, मुंबई येथील विविध संघटना, संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

भूमिपुत्रांचे कैवारी दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेच पाहिजे अशी आग्रही आणि ठाम भूमिका येथील प्रकल्पगस्त शेतकरी, स्थानिकांनी आणि लोकप्रतिनिधींनी घेतली आहे. त्या अनुषंगाने जासई येथे चौथी बैठक झाली.

पुढील बैठकीत आंदोलनाची रणनिती आणि यामध्ये प्रकल्पग्रस्त ९५ गावांचा समावेश करण्यासंदर्भात नियोजन करण्यात येणार आहे. २४ जूनला होणारे आंदोलन 'अभी नही तो कभी नही' हि भूमिका घेऊन करण्याचे या बैठकीत सर्वानुमते जाहीर करण्यात आले, त्यामुळे लाखोंचा जनसमुदाय रस्त्यावर उतरण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. त्या अनुषंगाने रणनीतीची बैठक रविवारी(दि. २३) सकाळी ११ वाजता पनवेलमधील महात्मा फुले सभागृह (आगरी समाज हॉल ) येथे होणार आहे.

यावेळी दशरथ पाटील दिबांचे नाव विमानतळाला देण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, अशोक चव्हाण, बाळासाहेब थोरात यांच्याशी पत्रव्यवहार करून भेटीची वेळ मागितली होती, मात्र अद्यापही या मंडळींनी त्यावर वेळ दिली नाही, दखलही घेतली नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. सर्वोत्तपरी पत्रव्यवहार करूनही वेळ दिली जात नाही हि चांगली बाब नाही. नामदार एकनाथ शिंदेंनी प्रकल्पग्रस्तांना विश्वासात घेऊन काम करणे गरजेचे होते.मात्र त्यांनी तसे केले नाही. शिवसेना बाळासाहेबांचे नावावर ठाम असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे शासनाकडून वारंवार टाळाटाळ केली जात आहे. असा टोला त्यांनी लगावत असे असले तरी कृती समितीच्या माध्यमातून दिबांसाठी लढा कायम राहील. त्यासाठी काहीही करायची भूमिका समितीमधील मंडळींनी घेतली आहे, असे नमूद केले. ज्यांना अंतकरणाने दिबांचे नाव विमानतळाला द्यावेसे वाटते ते या लढ्यात सोबत राहतील. एकसंघपणाने आपल्याला काम करायचे आहे. आता स्वस्थ बसायचे नाही, असे दशरथ पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

### दिबांच्या नावासाठी लढा आणि त्यासाठी शपथ

२४ जूनच्या आंदोलनच्यापुर्वी १० जूनला कॉम्रेड एल. जी. पाटील यांच्या स्मृतिनिधी दिबांचे नाव विमानतळाला मिळेपयर्यंत लढा देण्याची शपथ घेतली जाणार आहे. यावेळी वकील संघटनेचे अध्यक्ष मनोज भुजबळ यांनी जवळपास पाच हजार वकिलांची ताकद या लढ्याला मिळेल असे आश्वासन दिले.

### तरुणांचीही ताकद मिळणार

प्रत्येक क्षेत्रात तरुणांची ताकद महत्वाची असते. अर्धी लढाई या ताकदीतून यशस्वी होत असते. या बैठकीत लोकप्रतिनिधी, समितीने आपले विचार मांडले. त्यावेळी अनेक तरुणांनी बैठकीत मनोगत व्यक्त करताना दिबांच्या नावासाठी जिगरबाज तरुणाई या लढ्यात उतरणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे या तरुणांच्या भूमिकेचा सर्वांनी स्वागत केले.

### जन आंदोलनात रायगड ते मुंबई सहभागी

बैठकीला रायगड, नवी मुंबई, ठाणे, पालघर, मुंबईतील विविध संघटनांचे पदाधिकारी आवर्जून उपस्थितीत होते. या सर्वांनी आपापल्या संघटना २४ जूनच्या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे आंदोलनाला रायगड ते मुंबईची आणखी ताकद मिळाली आहे.



संपर्क करूनसुद्धा नामदार एकनाथ शिंदे टाळाटाळ करीत आहेत. हि भूमिका न्यायाची नाही. दिबांचे नाव विमानतळाला मिळालेच पाहिजे त्यामुळे आंदोलनाची व्याप्ती वाढविण्याची गरज पडली तरी ती वाढवू या.

**- माजी खासदार जगन्नाथ पाटील**



दिबासाहेबांचे नाव नवी मुंबई विमानतळाला मिळालाच पाहिजे आणि तो आपला हक्क आहे. त्याकरिता आपला लढा कायम राहील. आंदोलन दणदणीत झाला पाहिजे. संपूर्ण महाराष्ट्रातील नाही तर देशातील नागरिकांनी या आंदोलनाची दखल घेतली पाहिजे. आंदोलनात फूट पाडण्याची विरोधाभास निर्माण करण्याचे प्रयत्न होतील, पण कुणालाही घाबरायची गरज नाही. आपला हक्क मिळविण्यासाठी संघर्ष तीव्र करू या.

**- माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर**



प्रकल्पग्रस्ताचे नेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेच पाहिजे, हि आमची ठाम मागणी आहे. ०३ मे पासून या संदर्भातील बैठका सुरु आहेत. दिबांचे नाव दिले तर आंदोलन स्थगित केले जाईल नाही तर २४ जूनला आंदोलन केले जाईल. दिबांच्या नावाचा आग्रह असल्याचा संदेश या कृती आंदोलनाच्या माध्यमातून राज्य, केंद्र सरकार प्रशासन पर्यंत पाहोचण्यासाठी आंदोलनाची जोरदार तयारी करू या.

**- आ.प्रशांत ठाकूर, अध्यक्ष- भाजप, उत्तर रायगड**

## उरण तालुका व शहर राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने केंद्र सरकारचा निषेध

**दै.रायगड नगरी । उरण**




राष्ट्रवादी कॉंग्रेस उरण शहर व तालुका यांच्या वतीने आज उरणमध्ये केंद्र सरकार विरोधात आंदोलन केले. पेट्रोल, डीझेल आणि घरगुती गॅंस दरवाढ, रासायनिक खतांच्या किमतीत भरमसाठ वाढ तसेच चक्रीवादळात न झालेली मदत यामुळे महाराष्ट्रावर अन्याय झाला आहे. केंद्र सरकार महाराष्ट्रावर करीत असलेल्या या अन्यायाचा निषेध राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी उरण शहराच्या आणि तालुका वतीने आज उरण बाजारपेठेत गांधी चौकात कोरोनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सामाजिक अंतर पालन पाळून केंद्र सरकारच्या मनमानी कारभाराविरोधात घोषणा बाजी करण्यात आली.

'देश मे मोदी है - तो महंगाई है. 'कोरोनाने वाचलो अन महागाई ने मेलो' अशा घोषणा व नारेबाजीतून केंद्र व मोदी सरकारचा निषेध व निदर्शने करण्यात आले. चुलीत घाला तुमची प्रधानमंत्री उज्वला योजना असा नाराजीचा सूरही यावेळी महिलांनी काढला असून जीवनावश्यक वस्तूंचे दिवसेंदिवस भाव वाढ होत असल्याने व मुख्यतः गॅस दरवाढ तर अक्षरश: आकाशाला भिडत असल्याने घरगुती आर्थिक बजेट कोलमडत आहे यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारवर तीव्र नाराजी व संताप व्यक्त करून निषेध व्यक्त केला.

यावेळी महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस प्रशांतभाऊ पाटील , भावनाताई घाणेकर-महाराष्ट्र प्रदेश महिला सरचिटणीस, मनोज भगत-तालुका अध्यक्ष, भार्गव पाटील -जिला उपाध्यक्ष, पुखराज सुथार-जिल्हा सरचिटणीस, कैलाश भोईर-तालुका युवक अध्यक्ष, गणेश नलावडे-शहराध्यक्ष, संध्याताई घरत-महिला शहराध्यक्ष, समाधान म्हात्रे-तालुका उपाध्यक्ष युवक, भूषण ठाकुर-तालुका सिटणीस मंगेश कांबळे, प्रदीपशेठ तांडेल, बाबासेठ मुकरी, तफसुल फसाटे, सचिन पाटील, गणेश पाटील,राजेश म्हात्रे, आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवसेना पक्षावर दादागिरी केल्यास खपवून घेतली जाणार नाही : विनोद घोसाळकर

**दै.रायगड नगरी । तळा**




तळा तालुका विकास कामाचा आढावा व तौक्ते वादळा पहाणी दौरा प्रसंगी तळा शिवसेना पक्ष कार्यालयात बैठक व पत्रकार परिषदेचे आयोजित केलेल्या बैठकीत पक्ष कार्यकर्ते, शिवसैनिक, विभाग प्रमुख व पक्षावर दादागिरी करणाऱ्या वर जशास तसे शिवसेने स्टाईलने उत्तर दिले जाईल असा इशारा दिला.

यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल नवगणे जिल्हा महीला संघटक तथा माजी नगरसेविका मुंबई प्रतिभाताई कंरजे, तालुका प्रमुख प्रध्दुम ढसाळ, उपतालुका प्रमुख शरद सारगे, शहरप्रमुख राकेश वडके, नगरसेवक, नगरसेविका, कार्यकर्तेशिवसैनिक उपस्थित होते. मागील वर्षापासून कोविंड १९ सुरू असून लॉंकडाऊन संचारबंदी, निसर्ग चक्रीवादळा पाठोपाठ तौक्ते वादळाचा जोरदार फटका पाच तालुक्यात बसला आहे. तर कोणाचे व्यवसाय, कोणाची नोकरी, गमावली आहे. शेती हा एकमेव व्यवसाय असून लॉंकडाऊनमुळे आर्थिक परिस्थिती विस्कटून गेली असतानाच वीजवितरण कंपनी मोठ्या प्रमाणावर बिल वसूलीचा तडाखा लावला आहे. बँकाचे हप्ते थकले आहेत अशा परिस्थितीत पैसे भरायचे कोठून? याबाबत आपण लक्ष घालावा वीज थकबाकी व बँक हप्ते भरण्यासाठी मुदत मिळावी अशी मागणी पत्रकार परीषदेत केली असता विचालेल्या प्रश्नांना उतर देताना म्हणाले कि उर्जा मंत्री व मुख्यमंत्र्यांजवळ चर्चा करून सोडविला जाईल. असे आश्वासन दिले.

यावेळी तळा शहरातील वरचा मोहल्ला रस्त्याच्या कामाची पहाणी केली. तसेच तळा पोलीस ठाणे येथे भेट देऊन शिवसैनिकांवर पक्षाच्या कार्यकर्त्यावर नेहमी दुजाभाव ठेवून केसेस दाखल केली जाते एका पक्षालाच फक्त न्याय दिला जातो. त्यांच्या दबावाखाली काम करू नका हे कधीच सहन केले जाणार नाही. समान न्याय द्या. अन्यथा वेगळी भुमिका घ्यावी लागेल. आपले काही कर्मचारी नाहक त्रास देत आहेत. असे सहा.पोलीस निरीक्षक शिवराज खराडे यांना सांगितले.

## तौक्ते चक्रीवादळा नंतर बत्ती गुल, इंटरनेट सेवा कोलमडली

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

तौक्ते चक्रीवादळामुळे जिल्ह्यात विविध ठिकाणी शेकडोंच्या संख्येने विजेचे खांब कोसळले, परिणामी अनेक भागात वीज पुरवठा खंडित होत आहे. शिवाय केबल इंटरनेट वायर तुटल्या व मोबाईल नेटवर्क देखील संथ सुरू आहे. त्यामुळे वर्कफ्रॉम होम करणाऱ्या नोकरदारांचे व विद्यार्थ्यांचे खूप वांदे झाले आहेत.

कोरोनामुळे मागील वर्षभरापासून अनेक खाजगी क्षेत्रात काम करणारे लोक वर्कफ्रॉम होम करत आहेत. त्यामुळे पुणे-मुंबई आदी विविध ठिकाणी काम करणारे लोक आपल्या घरी जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणावरून काम करत आहेत. तर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास व परीक्षा देखील ऑनलाइन सुरू आहेत. अशा प्रकारे संपूर्णपणे इंटरनेट व विजेवर काम अवलंबून असल्याने ही सेवा कोलमडल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले. आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या एका तरुणाने सांगितले की इंटरनेट सेवा विस्कळीत आहे. वीज देखील वारंवार खंडित होते. परिणामी अनेक अडचणी येत असून काम करता येत नाही. शिवाय शिल्लक काम अधिकचा वेळ देऊन करावे लागणार आहे. तर श्रीवर्धन-बोर्ली येथील द्वितीय वर्ष बीफार्म करणाऱ्या श्रद्धा कासारे या युवतीने सांगितले की सोमवारी (ता.१७) ऑनलाइन परीक्षा होती. आणि याच वेळी वादळ आलेले. केबल नेटवर्क आणि वीज पूर्णपणे गेलेली.

मोबाईल इंटरनेट देखील संथ होते. परिणामी परीक्षा अर्धवट सोडावी लागली. पुढील पेपर देखील देता आले नाहीत. सुधागड तालुक्यातील एका पालकांनी सांगितले की मुलीचे ऑनलाइन वर्ग सुरू आहेत. पण वीज आणि नेट विस्कळीत झाल्याने तिचा अभ्यास बुडाला आहे.

## २ महिलांच्या मृत्यूची चौकशी व अनधिकृत टपऱ्या हटविण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण शहरातील राम मंदिराची भिंत कोसळून झालेल्या अपघाता २ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे याची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच बांधकाम सुरू असताना त्याठिकाणी असलेल्या टपऱ्या त्वरित हलविण्यात याव्यात. अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना गटनेते गणेश शिंदे यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

तौकते चक्रीवादळामुळे सोमवार दिनांक १७ मे २०२१ रोजी सकाळी उरण शहरातील गणपती चौकात नव्याने उभारण्यात येत असलेल्या श्री राम मंदिराची ब्लॉक ची भिंत कोसळून मंदिराला लागूनच काही अनधिकृत टपऱ्या थाटल्या आहेत त्याच्यावर हे ब्लॉक पडून चेंडू सारखे उडून समोर बसलेल्या दोन भाजीविक्रेत्या अंगावर फेकले जावून त्या जबर जखमी झाल्या. या अपघातात २ महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या अनधिकृत टपऱ्यामुळे उरण बाजारपेठ मध्ये जाण्यास मोठा अडथळा निर्माण होऊन मोठी गर्दी होत आहे. हे बाजारपेठचे ठिकाण लोकांनीं गजबजलेला असतो. राम मंदिराचे बांधकाम सुरू असून त्याठिकाणी सुरक्षततेच्या दृष्टीने कोणतीही खबरदारी घेतलेली दिसत नाही. याबाबत नगरपालिकेने जाणूनबुजून त्यांना पाठीशी घालण्याचे काम करीत आहेत.

त्यामुळे भविष्यात आशा घटना पुन्हा होऊ शकतात. तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने श्री राम मंदिराच्या लागून असलेल्या सर्व अनधिकृत टपऱ्या त्वरीत हटवाव्यात व २ मयत महिलांच्या दुर्दैवी घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी अशी मागणी शिवसेना गटनेते गणेश शिंदे यांनी उरण नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना पत्राद्वारे केली आहे. अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन केल्याशिवाय गप्प बसणार नाही असा इशारा दिला आहे. सदर घटनेची उशिरा का होईना शिवसेनेनी दखल घेतल्याबद्दल जनतेत समाधान व्यक्त केले जात आहे. परंतु अनधिकृत बांधकामासंदर्भात कोणताच उल्लेख न केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. याबाबत मुख्याधिकारी संतोष माळी यांनी कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही.